**MHBU130027752025**

दाखल दिनांक : १४.११.२०२५
नोंदणी दिनांक : १४.११.२०२५
निकाल दिनांक : २०.०४.२०२६
कालावधी : ५ महिने ६ दिवस

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, चिखली, यांचे न्यायालयात.**
**(पीठासीन अधिकारी : आय.ए.वाय.ए. खान)**

**सं.फौजदारी खटला क्र. १७२५/२०२५**
**निशाणी क्रमांक १४५**

महाराष्ट्र शासन,
तर्फे : पोलीस स्टेशन अधिकारी,
पोलीस स्टेशन मलकापुर शहर,
ता. मलकापुर, जि. बुलडाणा. ..... **अभियोगपक्ष**

**- विरुध्द -**

१. युसुफ उस्मान खान,
वय ४९ वर्ष, धंदा - माजी नगर सेवक,
२. रईस खान रशीद खान जामदार,
वय ४७, धंदा - नगर सेवक,
३. राजेश विश्वनाथ पाटील,
वय ४५, धंदा - नगर सेवक,
४. अशपाक खॉ उस्मान खॉ,
वय ४८ वर्ष, धंदा - मजुरी,
५. सै. अकरम सै. रहीम,
वय ३५ वर्ष, धंदा - मजुरी,
६. राजेंद्र वसंतराव वाडेकर,
वय ५० वर्ष, धंदा - मजुरी,

७. हरीष महादेवसिंग रावळ,
वय ५२ वर्ष, धंदा - नगराध्यक्ष,

८. प्रमोद विश्वनाथ अवसरमोल,
वय ५२ वर्ष, धंदा - नगरसेवक,

९. शेख रऊफ शेख कादर (बागवान),
वय ५९ वर्ष, धंदा - मजुरी,

१०. शेख महेबुब शेख बुडन,
वय ४९ वर्ष, धंदा - मजुरी,

११. शेख सलीम (बम्बईया) शेख बशीर,
वय ४९ वर्ष, धंदा - मजुरी,

१२. शेख सलमान शेख हमीद,
वय २३ वर्ष, धंदा - मजुरी,

१३. युसुफ खान सलाम खान,
वय ५८ वर्ष, धंदा - मजुरी,

१४. हाशिम खान खलील खान,
वय ३९ वर्ष, धंदा - मजुरी,

१५. इरफान खान उस्मान खान,
वय ४९ वर्ष, धंदा - मजुरी,

१६. सलीम खॉ करीम खॉ,
वय ४९ वर्ष, धंदा - मजुरी,

१७. बिस्मील्ला खान चांद खान,
वय ६९ वर्ष, धंदा - माजी नगर सेवक,

१८. एजाज अहेमद शाह अय्याज शाह,
वय ३५ वर्ष, धंदा - नगर सेवक,

१९. शेख शकील (गरम) शेख रहेमान,
वय २९ वर्ष, धंदा - मजुरी,

२०. रशीद खान युसफ खान (जमादार),
वय ७२ वर्ष, धंदा - उपनगर अध्यक्ष,
२१. राजेश पंडीतराव एकडे,
वय ५० वर्ष, धंदा - आमदार,
क्र. १ ते २० रा. मलकापुर, ता. मलकापुर,
क्र. २१ रा. एकडे ले आऊट, नांदुरा,
ता. नांदुरा, जि. बुलडाणा. ..... **आरोपी**

**गुन्हा** :- भारतीय दंड विधान कलम १८८, २६९, २७०, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ कलम ५१(ब), साथीचे रोग अधिनियम, १८९७ कलम ३ व ४ आणि महाराष्ट्र पोलीस कायदा, १९५१ चे कलम १३५ प्रमाणे.

---

अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. मो. बशीर
आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. व्ही.एन. नन्हई.

---

## न्या य नि र्ण य

**(घोषीत दि. २०/०४/२०२६)**

आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कलम १८८, २६९, २७०, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ कलम ५१(ब), साथीचे रोग अधिनियम, १८९७ कलम ३ व ४ आणि महाराष्ट्र पोलीस कायदा, १९५१ चे कलम १३५ नुसार खटला चालवित येत आहे.

२. **अभियोग पक्षाचे कथन** -

फिर्यादी पोलिस कॉस्टेबल मनोज कुमार महादेव उमाळे यांनी पोलिसस्टेशन मलकापुर शहर येथे फिर्याद दिली की, दि. १४.०७.२०२१ रोजी सायंकाळी ६.०० वाजताचे सुमारास नगर पारपेठ भागात झालेल्या कार्यक्रमाचा व्हीडीओ सोशल मिडीयावर वायरल झाल्याने सदर व्हीडीओमध्ये दिसत असलेले श्री राजेश विश्वनाथ पाटील यांना पो.स्टे. ला बोलावून त्याबाबत विचारपूस केली असता त्यांनी सांगितले की, मा. आमदार राजुभाऊ ऐकडे विधानसभा सदस्य यांच्या वाढदिवसा निमित्ताने नगर परिषद मलकापुरच्या वतीने पारपेठ भागातील आसिफ खान यांच्या किराणा दुकानापासून ते अशपाक खान यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉक्रेटीकरण रस्त्याचे उद्घाटन कार्यक्रम असल्याने सदर कार्यक्रमाला सर्व आरोपी व इतर २० ते २५ इसम उपस्थित होते. सदर कामाचे उद्घाटन आरोपी क्र. २१ आमदार राजु ऐकडे विधानसभा सदस्य यांनी केल्याबाबत सांगितले. सदर कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या लोकांनी तोंडाला कोणताही कापड किंवा मास्क न लावता, कोणत्याही प्रकारचा सोशल डिस्टंन्सचे पालन न करता मा. जिल्हाधिकारी यांचे क्र. गृहविभाग कक्ष ४–२/कावी/७८२/२०२१ दि. २६.०६.२०२१ अन्वये आदेशाचे उल्लंघन केले. तसेच सर्व आरोपींनी मा. जिल्हाधिकारी, बुलडाणा यांनी कोवीड १९ या संसर्गजन्य आजाराच्या अनुषंगाने

रितसर जारी केलेल्या आदेशाची अवज्ञा करुन जिवीतास धोका निर्माण होईल अशा कोरोना संसर्ग पसरविण्याची संभावना असताना एकत्र येवुन हयगयीचे वर्तन केले आहे. त्यानंतर फिर्यादीने मलकापुर शहर पोलिसस्टेशन येथे फिर्याद दाखल केली.

३. सदर फिर्यादवरुन आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता कलम १८८, २६९, २७०, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ कलम ५१(ब), साथीचे रोग अधिनियम, १८९७ कलम ३ व ४ आणि महाराष्ट्र पोलीस कायदा, १९५१ चे कलम १३५ अन्वये गुन्हा नोंद क्र. ४२३/२०२१ दाखल झाला. तपासिक अंमलदार हे.कॉ. सह.पा.उपनिरीक्षक सुखदेव अवधुत भोरकडे यांनी घटनास्थळ पंचनामा तयार केला. तपास टिपण नोंदवले. तपासाअंती आरोपींविरुद्ध वरील कलमान्वये न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता कलम १८८, २६९, २७०, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ कलम ५१(ब), साथीचे रोग अधिनियम, १८९७ कलम ३ व ४ आणि महाराष्ट्र पोलीस कायदा, १९५१ चे कलम १३५ प्रमाणे दोषारोप निश्चित केले. आरोपींना सदर दोषारापातील मजकूर वाचून व समजावून सांगितला असता त्यांनी गुन्हा कबुल नसल्याचे सांगितले व संपरिक्षेची मागणी केली.

५. आरोपीविरुद्ध सबळ पुरावा दोषी ठेवण्याइतपत आल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये आरोपीचे निवेदन अनुक्रमे नि. १०७ ते १२५ अन्वये नोंदविण्यात आले आहे.

६. माझ्या विचाराधीन उद्भवलेले मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

| **अ.नं.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने हे सिद्ध केले का की, दिनांक १४/०७/२०२१ रोजी सायंकाळी ६.०० वाजण्याच्या सुमारास आरोपींनी गैरकायद्याची मंडळी जमाव जमवुन मा. जिल्हाधिकारी यांचे जमावबंदी आदेशाचे उल्लंघन केले व आरोग्य विभागाचा कोवीड-१९ बाबत घातक आजाराचा प्रसार होईल असे कृत्य करु नये या आदेशाचा भंग करुन जमाव जमवुन आरोपींनी कोवीड-१९ या आजाराचा प्रसार होईल असे कृत्य केले व त्यायोगे भारतीय दंड विधान, १८६० चे कलम १८८, २६९, २७०, कलम ३ व ४ साथीचे रोग अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला ? | **नाही.** |
| २. | अभियोगपक्षाने असे सिध्द केले काय की, वरील दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपींनी गैरकायद्याची मंडळी जमाव जमवुन तोंडाला कोणताही कापड किंवा मास्क न लावता कोराना रोगाचा संसर्ग पसरवण्याची संभावना असतानासुध्दा एकत्र येऊन मा. जिल्हाधिकारी यांच्या आदेशाचे उल्लंघन | **नाही.** |

| | | |
|---|---|---|
| | केले व त्यायोगे भारतीय दंड विधान, कलम ५१(ब) आपत्ती व्यवस्थापण अधिनियम अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला ? | |
| ३. | अभियोगपक्षाने असे सिध्द केले काय की, वरील दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपींनी गैरकायद्याची मंडळी जमवून समान उद्दीष्ट साधण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या जमावबंदी आदेशाचा भंग केला व त्यायोगे महाराष्ट्र पोलीस कायदा, १९५१ चे कलम १३५ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला ? | **नाही.** |
| ४. | आदेश काय ? | **आरोपी यांना निर्दोष मुक्त करण्यात येते.** |

## कारणमिमांसा

७. सरकारी अभियोक्ता मो.बशीर मो.नसीर व आरोपीतर्फे वकील श्री. व्ही.एन. नन्हई यांचा युक्तीवाद ऐकला. अभियोग पक्षातर्फे दाखल केलेली कागदपत्रे तपासली.

८. अभियोग पक्षाने एकुण पाच साक्षीदार तपासले त्यामध्ये सा. क्र. १ फिर्यादी मनोज महादेव उमाळे यांस नि.क्र. ७६ वर, सा.क्र. २ दिलीप बाबाराव देशमुख यास नि.क्र. ७९ वर, सा.क्र. ३ संतोष त्र्यंबक कुमावत यांना नि.क्र. ८० वर, सा.क्र. ४ विनय गजानन काळे यांना नि.क्र. ८२ वर, सा.क्र. ५ सुखदेव अवधुत बोरकडे यास नि.क्र. ८३ तपासले.

९. अभियोग पक्षाने आरोपीवर कलम १८८, २६९, २७०, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ कलम ५१(ब), साथीचे रोग अधिनियम, १८९७ कलम ३ व ४ आणि महाराष्ट्र पोलीस कायदा, १९५१ चे कलम १३५ खालील गुन्हा सिध्द करणे गरजेचे आहे. त्या अनुषंघाने मी सदर कलम पुराव्याचे पुनरुच्चारण करणेकामी खाली प्रमाणे पुनरुच्चीत करीत आहे.

**Section 269 Negligent act likely to spread infection of disease dangerous to life.**

Whoever unlawfully or negligently does any act which is, and which he knows or has reason to believe to be, likely to spread the infection of any disease dangerous to life, shall be punished with imprisonment of either description for a term which may extend to six months, or with fine, or with both.

**Section 270 Malignant act likely to spread infection of disease dangerous to life**

Whoever malignantly does any act which is, and which he knows or has reason to believe to be, likely to spread the infection of any disease dangerous to life, shall be punished with imprisonment of either description for a term which may extend to two years, or with fine, or with both.

**Section 188 Disobedience to order duly promulgated by public servant**

Whoever, knowing that, by an order promulgated by a public servant lawfully empowered to promulgate such order, he is directed to abstain from a certain act, or to take certain order with

certain property in his possession or under his management disobeys such direction, shall, if such disobedience causes or tends to cause obstruction, annoyance or injury, or risk of obstruction, annoyance or injury, to any persons lawfully employed, be punished with simple imprisonment for a term which may extend to one month or with fine which may extend to two hundred rupees, or with both; And if such disobedience causes or tends to cause danger to human life, health or safety, or causes or tends to cause a riot or affray, shall be punished with imprisonment of either description for a term which may extend to six months, or."

**Section 3 & 4 of epidemic disease Act.**

(1) Any person disobeying any regulation or order made under this Act shall be deemed to have committed an offence punishable under section 188 of the Indian Penal Code (45 of 1860).

(2) Whoever,—(i)commits or abets the commission of an act of violence against a healthcare service personnel; or(ii)abets or causes damage or loss to any property, shall be punished with imprisonment for a term which shall not be less than three months, but which may extend to five years, and with fine, which shall not be less than fifty thousand rupees, but which may extend to two lakh rupees.

(3) Whoever, while committing an act of violence against a healthcare service personnel, causes grievous hurt as defined in section 320 of the Indian Penal Code to such person, shall be punished with imprisonment for a term which shall not be less than six months, but which may extend to seven years and with fine, which shall not be less than one lakh rupees, but which may extend to five lakh rupees."

**Section 51 (b) in The Disaster Management Act, 2005**

(a)obstructs any officer or employee of the Central Government or the State Government, or a person authorised by the National Authority or State Authority or District Authority in the discharge of his functions under this Act; or(b)refuses to comply with any direction given by or on behalf of the Central Government or the State Government or the National Executive Committee or the State Executive Committee or the District Authority under this Act, shall on conviction be punishable with imprisonment for a term which may extend to one year or with fine, or with both, and if such obstruction or refusal to comply with directions results in loss of lives or imminent danger thereof, shall on conviction be punishable with imprisonment for a term which may extend to two years.

"Section 135 makes it an offense to disobey or fail to comply with orders, directions, or notifications issued by the State Government or a police officer under Section 37 of the Act."

"The offense is considered cognizable if the conditions set by the law are met, allowing a police officer to arrest without a warrant and start prosecution. If these conditions are not met, it becomes a non-cognizable offense."

"या कलमाचा वापर सार्वजनिक सुव्यवस्थेसाठी लागू केलेले नियम आणि कायदे लागू करण्यासाठी केला जातो, जसे की वाहतूक, सभा किंवा कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक असलेल्या इतर क्रियाकलापांवर निर्बंध."

**<u>मुद्दा क्र.१ ते ३ बाबत</u>** :–

१०. मुद्दा क्र. १ ते ३ हे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे पुराव्यावरील विश्लेषणाची पुनरावृत्ती टाळण्यासाठी मी त्यावर एकत्रितपणे चर्चा करीत आहे.

११. अभियोगपक्षाच्या वतीने आरोपीवर कलम १८८, २६९, २७०, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ कलम ५१(ब), साथीचे रोग अधिनियम, १८९७ कलम ३ व ४ आणि महाराष्ट्र पोलीस कायदा, १९५१ चे कलम १३५ नुसार गुन्हा सिध्द करणेकामी एकुण पाच साक्षीदार तपासले. सा.क्र. १ मनोज महादेव उमाळे यांस नि.क्र. ७६ वर तपासले. त्याने त्याच्या सरतपासात कथन केले की, सदर साक्षीदार घटनेच्या दिवशी मलकापुर शहर पोलिसस्टेशन येथे पोलिस कॉन्स्टेबल म्हणुन कर्तव्यावर होता. त्यादिवशी सायंकाळी ७.०० वाजता मलकापुर येथील पारपेठ भागात झालेल्या कार्यक्रमाची व्हीडीओक्लीप त्याने व्हॉट्सअॅप या सोशल मिडीयावर बघीतली. सदर व्हीडीओक्लीपमध्ये राजेश पाटील हे तत्कालीन नगरसेवक दिसून आले त्यामुळे त्यांनी राजेश पाटील यांना बोलावून घेतले. त्याच्याकडे विचारणा केली असता त्याने सांगितले की, आमदार राजेश ऐकडे यांच्या वाढदिवसानिमित्ताने पारपेठ भागात रस्त्याचे कॉक्रीटीकरण कामाचे उद्घाटन हे आसीफ किराणा दुकानापासून ते युसूफ खान यांच्या घरापर्यंत केले. त्या कार्यक्रमासाठी सर्व आरोपी व ईतर इसम असे अंदाजे ४० ते ४५ लोक

जमा झाले होते. त्यावेळी कोरोनाचा प्रादुर्भाव असल्यामुळे मा. जिल्हाधिकारी साहेबांचे आदेश असतानासुध्दा त्यांनी कार्यक्रम ठेवून आदेशाचे उल्लंघन केले. त्यानंतर त्याने दुस–या दिवशी पोलिसस्टेशन मलकापुर शहर येथे फिर्याद दिली. सदर फिर्यादला नि.क्र. ७७ व छापील फिर्यादला नि.क्र. ७८ देण्यात आले.

१२. उलटतपासात त्याने मान्य केले की, तो मलकापुर पोलिसस्टेशन येथे सन २०२० पासून कार्यरत आहे. घटनास्थळ हे वर्दळीचे ठिकाण आहे. घटनेच्या आजुबाजूच्या लोकांनी त्याच्याकडे तक्रार दिली नव्हती. त्याने मान्य केले की, वाढदिवसाचा कार्यक्रम त्याने व्हॉट्सॲपवर बघीतला होता. त्याने व्हॉट्सॲपवर आलेला व्हीडीओ बघून सदरची फिर्याद दाखल केली. त्याने उलटतपासात मान्य केले की, सर्व आरोपी हे भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाचे पदाधिकारी आहेत. मलकापुर शहराचे माजी आमदार चैनसुख संचेती हे भाजप पक्षाचे आमदार होते. त्याने उलटतपासात मान्य केले की, माजी आमदार चैनसुख संचेती व राजु शेळके यांच्यात राजकीय वाद होते. त्याने गुन्हा घडल्यावर एक दिवस उशीराने फिर्याद दाखल केली. मा. जिल्हाधिकारी यांच्या आदेशाचा क्रमांक व दिनांक त्याला माहीत नाही.

१३. अभियोग पक्षाने सा.क्र. २ दिलीप बाबाराव देशमुख यास नि.क्र. ७८ वर तपासले. सदर साक्षीदार घटनेच्या दिवशी मलकापुर शहर पोलिसस्टेशन

येथे गोपनिय विभागामध्ये हेड कॉन्स्टेबल म्हणून कर्तव्यावर होता. आमदार राजेश ऐकडे यांचा वाढदिवस असल्यामुळे त्यांच्या पदाधिका–यांनी त्यांच्या वाढदिवसानिमित्त पारपेठ भागातील सिमेंट कॉँक्रेटचे उद्घाटन हे आसीफ किराना दुकानापासून ते युसुफ खान यांच्या घरापर्यंत केले होते. घटनेच्या वेळी सर्व आरोपी व त्यांच्यासोबत इतर २० ते २५ लोकांनी तोंडाला कोणत्याही प्रकारचा मास्क न लावता व सामाजिक अंतराचे पालन न करता उद्घाटन कार्यक्रम पार पाडला होता. सदर कार्यक्रमाचे चित्रीकरण हे सोशल मिडीयावर प्रसारीत झाले होते. त्यामुळे त्या भागातील नगरसेवक राजेश पाटील याला पो.कॉ. उमाळे याने बोलाविले व त्याला घटनेबाबत विचारपुस केली असता त्याने आरोपींनी मा. आमदार राजु ऐकडे यांच्या वाढदिवसाच्या कार्यक्रमानिमित्त एकत्र जमा होवून व पारपेठ भागातील सिमेंट–कॉक्रेटच्या रोडचे उद्घाटन केले. तसेच आरोपींनी मा. जिल्हाधिकारी यांचा कोरोना विषाणुसंबंधीचा आदेश असताना सुध्दा एकत्र जमून रस्त्याच्या कामाचे उद्घाटन करुन आदेशाचे उल्लंघन केले.

१४. उलटतपासात त्याने मान्य केले की, घटनास्थळ हे वर्दळीचे ठिकाण आहे. घटनेच्या आजुबाजूच्या लोकांची तक्रार त्याच्याकडे आली नव्हती. राजु ऐकडे यांचा वाढदिवसाचा कार्यक्रम होता त्यानिमित्ताने पारपेठ भागातील सिमेंट–कॉक्रेटच्या रोडचे उद्घाटन केले. त्याचा व्हीडीओ व्हॉट्सॲप या

सोशलमिडीयावर आला होता तो व्हीडीओ त्याने बघीतला होता. सदर दिवशी मा. जिल्हाधिकारी साहेबांचा जमावबंदी आदेश लागू होता. सदरचा जमावबंदी आदेश त्याने बघीतला नाही. त्याने त्याच्या उलटतपासात मान्य केले की, सर्व आरोपी हे भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाचे पदाधिकारी आहेत. मलकापुर शहराचे माजी आमदार चैनसुख संचेती हे भाजपा पक्षाचे कार्यकर्ते होते. घटनेच्या वेळी असलेल्या सर्व आरोपींची नावे त्याला माहीत नाही.

१५. अभियोग पक्षाने सा.क्र. ३ संतोष त्र्यंबक कुमावत यास नि.क्र. ८० वर तपासण्यात आले. सदर साक्षीदार घटनेच्या दिवशी मलकापुर शहर पोलिसस्टेशनला पो.कॉ. म्हणुन कर्तव्यावर हजर होता. सदर साक्षीदाराने सा.क्र. २ च्या साक्षीप्रमाणे साक्ष दिली आहे. तसेच उलटतपासात देखील सा.क्र. २ प्रमाणे त्याने त्याचा उलटतपास दिला आहे त्यामुळे मी येथे पुरुच्चीत करीत नाही.

१६. अभियोग पक्षाने सा.क्र. ४ विनय गजानन काळे यास नि.क्र. ८२ वर तपासले. सदर साक्षीदार हा पंच साक्षीदार आहे. दि. १५.०७.२०२१ रोजी त्याला पंचनामा करण्यासाठी बोलाविले नव्हते. घटनास्थळ पंचनाम्यावर त्याची सही नाही. मजकुराविषयी त्याला माहिती नाही. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षास सहकार्य न केल्यामुळे सरकार पक्षाने सदर साक्षीदारास सुचक प्रश्न विचारले सदर सुचक प्रश्नांची उत्तरे नकारार्थी दिली. सदर साक्षीदार फितुर झाला.

१७. अभियोग पक्षाने सा.क्र. ५ सुखदेव अवधुत बोरकडे सहा.पो.नि. तपासीक अधिकारी आहे. सदर गुन्हयाचा तपास त्याच्याकडे देण्यात आला. तपास कामी त्याला फिर्याद प्रथम खबर अहवालाची प्रत मिळाली. त्याने दोन पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा केला. घटनास्थळ पंचनाम्यातील मजकुर त्याने ओळखला त्यास नि.क्र. ८४ देण्यात आले. दिनांक १८.०७.२०२१ रोजी आरोपींना सुचनापत्र देण्यात आले होते सुचनापत्र त्याने ओळखले त्यास नि.क्र. ८५ देण्यात आले. तसेच २० सुचनापत्राला नि.क्र. ८६ ते १०५ देण्यात आले. साक्षीदारांचे जबाब नोंदविले जिल्हाधिकारी बुलडाणा यांचे जमाव बंदीचे आदेशाची छायांकीत प्रत दाखल करण्यात आले.

१८. उलटतपासात त्याने मान्य केले की, तो मलकापूर पोलिसस्टेशन येथे दिड वर्षापासून कार्यरत होता. त्यामुळे त्याला त्या भागाची परीपूर्ण माहिती होती. त्या भागात भरपूर दुकाने आहेत परंतु त्याने तेथील राहणा–या लोकांचा जबाब नोंदविला नाही तसेच घटनेबाबत फिर्याद एक दिवस उशीराने देण्यात आली आणि उशीराचे कारण किंवा स्पष्टीकरण फिर्यादी अथवा तपासीक अमलदाराला देता आले नाही. सदर साक्षीदाराने मान्य केले की, त्याने घटनास्थळ पंचनामा केला. परंतु, तेथे घटना होत असताना किंवा घटनेचे कसलेही फोटोग्राफ्स किंवा चित्रीकरण मोबाईलमध्ये व्हीडीओ घेतले नाही. त्याने जिल्हाधिकारी बुलडाणा

यांचे आदेश अस्तित्वात होते या अनुषंगाने सदर आदेशाची प्रत हस्तगत केली नाही. सबब, त्यावेळी जिल्हाधिकारी बुलडाणा यांचा आदेश अस्तित्वात होता याबाबत शंका निर्माण होते.

१९. वरील पुराव्याचे व कायद्याचे एकंदर अवलोकन करता असे दिसून येते की, आरोपीवर असे दोषारोप लादण्यात आले की, कोविड महामारीच्या काळात आरोपींनी दि. १४.०७.२०२१ रोजी सुमारे सायंकाळी ६.०० वाजता पारपेठ, मलकापुर येथे विनापरवानगी आरोपी क्रमांक २० आमदार राजेश ऐकडे यांचे वाढदिवसानिमित्ताने पारपेठ भागात रस्त्याचे कॉंक्रेटीकरण कामाचे उद्घाटन आसिफ किराना दुकानापासून युसूफ खान यांच्या घरापर्यंत केले. परंतु, तपासीक अमलदाराने या घटनेबाबत उद्घाटन करीत असताना चित्रीकरण किंवा व्हीडीओग्राफी हस्तगत केली नाही. घटनेच्या वेळी ४० ते ५० लोक जमा झाले होते परंतु केवळ एकूण २१ इसमांना प्रस्तूतच्या गुन्हयात आरोपी करण्यात आले. फिर्यादीला सर्व आरोपींचे नाव सुध्दा त्याचे सरतपासात सांगता आले नाही. सबब, सदर आरोपी गुन्ह्यात शामील होते यावर शंका निर्माण होते. सदर साक्षीदाराने जिल्हाधिकारी यांचे आदेश पाहिले नाही. सबब, जिल्हाधिकारी बुलडाणा यांचे आदेश अस्तीत्वात होते यावर शंका निर्माण होते. सदर फिर्यादीने आरोपींविरुध्द फिर्याद केवळ आरोपी क्र. २१ याचा वाढदिवस साजरा करीत

असताना दिसल्यावरुन फिर्याद दिली असे त्याने उलटतपासात मान्य केले. सबब, माझ्यामते फिर्यादीने दिलेली फिर्याद तंतोतंत सिध्द केली नाही.

२०. फिर्यादीने व साक्षीदार क्र. २ दिलीप बाबाराव देशमुख, सहा.पो.नि. व संतोष त्र्यंबक कुमावत, पो.कॉ. यांनी उलटतपासात मान्य केले की, आरोपी भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाचे पदाधिकारी आहेत. घटनेच्या वेळी भारतीय जनता पार्टीचे माजी आमदार चैनसूख संचेती आमदार होते. दोघांमध्ये राजकीय वाद होते. त्यामुळे सदरचा खटला राजकीय दबावातून दाखल करण्यात आला असे दिसून येते.

२१. सा.क्र. २ दिलीप बाबाराव देशमुख, सा.क्र. ३ संतोष त्र्यंबक कुमावत हे पोलिस साक्षीदार आहेत. सदर साक्षीदाराने फिर्यादीने दिलेल्या सरतपासासारखी साक्ष दिली. त्यामुळे मी येथे पुनोरुच्चारण करणेकामी नमुद करीत नाही.

२२. अभियोग पक्षाने सा.क्र. ४ विनय गजानन काळे यास नि.क्र. ८२ वर तपासले. सदर साक्षीदार घटनास्थळ पंच आहे. सदर साक्षीदाराने त्याचे समक्ष कसलाही घटनास्थळ पंचनामा केले नाही असे सरतपासात कथन केले. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षाला सहकार्य केले नाही त्याला फितूर घोषीत करण्यात आले. त्यामुळे सदर साक्षीदाराच्या साक्षीला कायदेशीर महत्व देता येत नाही.

२३. सबब, वरील पुराव्यावरुन असे निष्कर्ष काढता येईल की, अभियोग पक्षाने कोणत्या पोलिस अधिका-याने कोणत्या आरोपीला कोरोना आजार थांबविणेकामी जमावबंदी न करण्याचे आदेश दिले होते ते अभिलेखावर आले नाही. सबब, अभियोग पक्षातर्फे कलम १८८ भादवी सिध्द करण्यात आले नाही तसेच कोणत्या आरोपीने त्यांचे कृत्यामुळे कोरोना पसरविण्यात आला व कोणत्या इसमाला सदरचा आजार संसर्गजन्य झाले हे अभिलेखावर आले नाही व याबाबत कोणीही तक्रार दिली नाही त्यामुळे कलम २६९, २७० भा.द.वी., कलम ३, ४ साथीरोग अधिनियम व कलम ५१(बी) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ सिध्द केले नाही. अभिलेखावर जिल्हाधिकारी बुलडाणा यांचे जमावबंदी टाळणे व कोरोना संसर्ग वाढू नये व गैरवर्तन करु नये या बाबतचे कलम ३६(ए)(३) महाराष्ट्र पोलिस कायदा कलम १३५ सिध्द करु शकले नाही. फिर्याद एक दिवसानंतर उशीराने देण्यात आली त्याचे स्पष्टीकरण देण्यात आले नाही. उशीराचे कारण किंवा स्पष्टीकरण अभियोग पक्षातर्फे देण्यात आले नाही. अभियोग पक्षातर्फे कोणतेही स्वतंत्र साक्षीदार तपासण्यात आले नाही. सा.क्र. ४ घटनास्थळ पंच फितूर घोषीत करण्यात आला. घटनास्थळावर कॉंक्रेटीकरणाचे उद्घाटन केले या ठिकाणावरुन कसलेही सिमेंट, गिट्टी इत्यादी जप्त केले नाही. घटनास्थळाचे चित्रीकरण करण्यात आले नाही. सबब, घटनास्थळ पंचनामा सिध्द करण्यात

आले नाही. सा.क्र. १ ते ३ यांनी आरोपी क्रमांक २१ राजेश ऐकडे यांचा वाढदिवसानिमित्त आसिफ किराना दुकान ते युसूफ खान यांचे घरापर्यंत सिमेंट कॉंक्रेटचे रोडचे काम सुरू करण्यात आले असे चित्रण सदर साक्षीदाराने व्हॉट्सअॅप द्वारे बघीतले. परंतु, सदरची व्हीडीओग्राफी पेनड्राईव्ह इत्यादी अभिलेखावर दाखल करण्यात आले नाही. तपासीक अमलदाराने गुन्ह्याचा तपास औपचारीकरित्या केलेला आहे असे दिसून येते. सबब, मी मुद्दा क्र. १ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र. ०४ करिता.</u>**

२४. प्रस्तुत प्रकरणामध्ये भारतीय दंड विधान कलम १८८, २६९, २७०, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ कलम ५१(ब), साथीचे रोग अधिनियम, १८९७ कलम ३ व ४ आणि महाराष्ट्र पोलीस कायदा, १९५१ चे कलम १३५ अन्वये दोषारोप आरोपींविरुध्द संशयापलीकडे सिध्द झालेला नाही. त्यामुळे सर्व आरोपी निर्दोष म्हणून मुक्त करण्यास पात्र आहेत. सबब, मुद्दा क्र. ४ च्या अनुषंगाने खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

## आ दे श

१) आरोपी क्र.१ युसुफ उस्मान खान, आरोपी क्र.२ रईस खान रशीद खान जामदार, आरोपी क्र.३ राजेश विश्वनाथ पाटील, आरोपी क्र.४ अशपाक खॉ उस्मान खॉ, आरोपी क्र.५ सै. अकरम सै. रहीम, आरोपी क्र.६

राजेंद्र वसंतराव वाडेकर, आरोपी क्र.७ हरीष महादेवसिंग रावळ, आरोपी क्र.८ प्रमोद विश्वनाथ अवसरमोल, आरोपी क्र.९ शेख रऊफ शेख कादर (बागवान), आरोपी क्र.१० शेख महेबुब शेख बुडन, आरोपी क्र.११ शेख सलीम (बम्बईया) शेख बशीर, आरोपी क्र.१२ शेख सलमान शेख हमीद, आरोपी क्र.१३ युसुफ खान सलाम खान, आरोपी क्र.१४ हाशिम खान खलील खान, आरोपी क्र.१५ इरफान खान उस्मान खान, आरोपी क्र.१६ सलीम खॉ करीम खॉ, आरोपी क्र.१७ बिस्मील्ला खान चांद खान, आरोपी क्र.१८ एजाज अहेमद शाह अय्याज शाह, आरोपी क्र.१९ शेख शकील (गरम) शेख रहेमान, आरोपी क्र.२० रशीद खान युसफ खान (जमादार), आरोपी क्र.२१ राजेश पंडीतराव एकडे यांना भारतीय दंड विधान कलम १८८, २६९, २७०, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ कलम ५१(ब), साथीचे रोग अधिनियम, १८९७ कलम ३ व ४ आणि महाराष्ट्र पोलीस कायदा, १९५१ चे कलम १३५ अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या अपराधांतुन फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम २५५(१) नुसार निर्दोष मुक्त करण्यांत येत आहेत.

२) आरोपीचे बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येते.

३) आरोपींनी कलम ४३६(अ) फौजदारी प्रक्रिया संहिते प्रमाणे रु. ६,०००/– ची जमानत द्यावी.

(न्यायनिर्णय खुले न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

Digitally signed by IRFANALIKHAN YOUSUF ALI KHAN
Date: 2026.04.20 18:22:40 +0530

**(आय.ए.वाय.ए. खान)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
चिखली

दिनांकः- २०/०४/२०२६

## CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | G.V. Nimje<br>Stenographer Grade III |
| Court | : | C.J.J.D. & J.M.F.C., Chikhli. |
| Date | : | 20/04/2026 |
| Signed by P. O. on | : | 20/04/2026 |
| Uploaded on | : | 20/04/2026 |